**कायम विना अनुदान तत्वावर ( इंग्रजीमाध्यम )**

पुणे जिल्हा परीषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन,
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प./शिक्षण/प्राथ./२/
/खा.प्रा.शा./८०/ दि.१/१०/०६

प्रति,
मुख्याध्यापक,/मुख्याध्यापिका,
उत्कर्ष इंग्लिश मेडियम स्कूल
सोलापूर बझार, पुणे-१

विषय :- कायम विना अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्या प्राथम /जादा तुकडया/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत...

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक-व्ही.एल.एस.-१००२/ (१०००/०२) प्रा.शि.-३ दिनांक १४ जाने.२००३.

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमुद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा / नैसर्गिक वाढीचा / वाढीच्या प्रथम/ जादा तुकडया / वर्ग जून २०० पासून सन् २०० - २०० या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटींच्या आधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडीवाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | कॅम्प एज्यु.सोसायटीचे उत्कर्ष इंग्लिश मेडी स्कूल | इंग्रजी | ३.७वी | तुकडी-दुसरी जादा | मंजूर |

**अटी व शर्ती**

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या आधीन राहून नेमला पाहिजे.

२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापनविषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.

३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.

४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परीसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

६. सदर शाळेच्या वर्गास / तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.

७. तपासणीअंती एकजरी अट नियमबाह्य निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.

८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी, (प्राथमिक)
पुणे जिल्हा परीषद,पुणे

प्रत :माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी रवाना.

१. सचिव / अध्यक्ष